# इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया 2014-15

## प्रसिद्धीपत्रक

पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील कॉलेज मध्ये इ. ११ वी ऑनलाईन पध्दतीने प्रवेश प्रक्रिया सुरु आहे. विद्यार्थ्यांनी दिनांक १९/६/२०१४ ते २३/६/२०१४ पर्यंत आपला ऑनलाईन फॉर्म (पार्ट-१ व पार्ट-२) भरुन **submit** व **Confirm** करणेबाबत यापूर्वीच कळविण्यात आलेले आहे.

पुणे शहरात ज्ञानेश्वर माऊली आणि तुकाराम महाराजांच्या पालख्या दाखल झालेल्या आहेत. पालख्यांमुळे रहदारीचा रस्ता खुला नसणे, शाळांमध्ये दिंडीं, वारकरी यांचा मुक्काम असणे यामुळे व पालकांच्या मागणीमुळे ऑनलाईन प्रवेश अर्ज भरण्याची मुदत एक दिवसाने वाढवून दिनांक २४/६/२०१४ सायंकाळी ५.०० वा.पर्यंत ठेवण्यात आली आहे.

एसएससी बोर्डाच्या ज्या विद्यार्थ्यांना आरक्षणाचा फायदा हवा आहे त्यांनी आपले इ. ११ वी प्रवेश अर्ज आपल्या संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांकडून अप्रुव्ह केले नसतील तर अप्रुव्ह करुन घ्यावे व तद्नंतर **Option Form** भरावा.

एसएससी बोर्डा व्यतिरिक्त इतर बोर्डाच्या विद्यार्थ्यांनी आपले इ. ११ वी प्रवेश अर्ज (आरक्षण असो अथवा नसो) १) मराठवाडा मित्रमंडळ कॉलेज, डेक्कन जिमखाना, पुणे २) नेस वाडीया कॉलेज, पुणे १ या ठिकाणी जावून अप्रुव्ह करुन घ्यावे व पार्ट -२ चा फॉर्म भरुन **submit** व **Confirm** करावा.

दि. २२/६/२०१४

22/6/14

(सुमन शिंदे)
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे १